पीएच.डी. संशोधन आराखडा

# “लातूर जिल्ह्यातील यात्रास्थळे व वाहतूक जाळ्यांचे भौगोलिक विश्लेषण”

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

सामाजिक शास्त्रे शाखे अंतर्गत भूगोल विषयातील पीएच.डी.

(विद्यावाचस्पती) या पदवीकरिता सादर केल्या जाणाऱ्या

शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

**संगमेश्वर ज्ञानोबा भांगे**

(एम.ए.,बी.एड्., एम.फिल.)

मार्गदर्शक

**प्राचार्य डॉ.सदानंद हरीबा गोने**

उज्वल ग्रामीण महाविद्यालय, घोणसी

ता.जळकोट जि.लातूर

संशोधन केंद्र

श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

**मार्च, २०१६**

## “लातूर जिल्ह्यातील यात्रास्थळे व वाहतूक जाळ्यांचे भौगोलिक विश्लेषण”

### १.१ प्रस्तावना :

भारत ही विविध जाती धर्मांची भूमी आहे. हिंदू धर्माच्या नावावरुन भारताला हिंदुस्थान या नावाने ओळखले जाते- जगातील प्रमुख धर्मापैकी हिंदू, मुस्लिम, बौध्द, शिख, जैन इ. धर्माचे लोक भारतात आहेत. विविध धर्माचे यात्रा व सण-उत्सव वेगवेगळे आहेत. त्यांच्या रूढी, परंपरा यामध्येही वेगळेपण दिसून येतो. तसेच विविध धर्माच्या, विविध रुढी परंपरामुळे त्या-त्या धर्माचे विविध सण-उत्सव साजरे केले जातात. तसेच महाराष्ट्रामध्ये प्रामुख्याने विविध सण व यात्रा प्रत्येक धर्माच्या देवी देवतांशी संबंधीत आहेत. लोक आपापल्या धर्माच्या देवी देवतांकडे धनसंपत्ती, संतती, प्रसिद्धी व दीर्घ आयुष्यासाठी प्रार्थना करतात. म्हणून त्या त्या भागातील देवी देवतांच्या ठिकाणांना अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. ग्रामीण भागातच मोठ्या प्रमाणात या प्रथा प्रचलित आहेत. महाराष्ट्रही या प्रथेपासून दूर राहिलेला नाही. अतिप्राचीन काळापासून विविध प्रकारच्या विधी, होम, हवण, यात्रा, सण, उत्सव या सर्व प्रथा भारतातील विविध भागात मोठ्या प्रमाणात आढळून येतात.

महाराष्ट्रामध्ये हिंदू धर्माचे सर्वाधिक प्राबल्य दिसून येते. प्रत्येक शहरामध्ये, गावामध्ये मोठ्या प्रमाणात हिंदू देवी-देवतांची सर्वाधिक मंदिरे आहेत. त्यांच्या दैवी प्रभावाप्रमाणे त्या त्या भागात प्रमाणात यात्रा, सण, उत्सव, मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात. महाराष्ट्रात अशी प्रसिद्ध देवी-देवतांची मंदिरे असून त्यांच्या यात्रा या वेगवेगळ्या कालावधीत भरतात. हिंदू धर्मासोबतच महाराष्ट्रात अनेक मुस्लिम, शिख, जैन इ. धर्माची मंदिरे व मस्जिद आहेत. त्याठिकाणी यात्रा किंवा सण-उत्सव साजरे केले जातात.

महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्यात विविध धर्माचे लोक वास्तव्यास आहेत. लातूर जिल्ह्यातील विविध धर्माच्या विविध देव-देवता प्रसिद्ध आहेत. त्यांच्या यात्रांचा कालावधी, त्या यात्रा कधी भरतात, यात्रेत किती भाविक सामील होतात, याचा सविस्तर अभ्यास

प्रस्तुत संशोधनात करण्यात येणार आहे. त्याचबरोबर या यात्रा स्थळांवर वाहतूक जाळयांचा काय प्रभाव आहे याचाही संबंध अभ्यासण्यात येणार आहे.

अलिकडच्या काळामध्ये प्रत्येक क्षेत्रामध्ये अमुलाग्र बदल झालेला आहे. वाढत्या यात्रा स्थळांच्या स्वरूपामध्ये बदल घडवून आणण्यास त्या ठिकाणच्या दळणवळण सुविधा व वाहतूक व्यवस्था यांचा प्रभाव असल्याचे दिसून येते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे वाहतूक व दळणवळ तंत्रज्ञानातील बदल व आधुनिकता हे होय. यामुळे यात्रा ठिकाणी प्रवास करण्याच्या सोयी-सुविधा सहज उपलब्ध झालेल्या आहेत. म्हणून विविध ठिकाणच्या यात्रांचा व वाहतूक जाळ्याचा अतिशय जवळचा संबंध आहे. आज आपण वाहतूक जाळ्याच्या सोयीमुळे देशातील कोणत्याही ठिकाणच्या देवी-देवतांच्या यात्रासाठी सहज प्रवास करू शकतो. यात्राबरोबर वाहतूक क्षेत्राला अनन्यसाधारण असे महत्त्व प्राप्त झाले आहे. कारण पूर्वी दळणवळणाच्या सोयी तितक्या प्रमाणात उपलब्ध नव्हत्या. पण अलिकडच्या काळात उपलब्ध असलेल्या दळणवळणाच्या सोयी-सुविधेमुळे प्रवास करणे सोपे झालेले आहे. त्यामुळे यात्रास्थळांबरोबर मोठ्या प्रमाणात वाहतूक जाळयांना अतिशय महत्त्व प्राप्त झालेले आहे.

सुख, समाधान किंवा आनंद मिळविण्यासाठी यात्रा स्थळे विकसित झालेली दिसून येतात. यात्रास्थळे पर्यटन भूगोलाची नवी शाखा आहे. Fair या शब्दाची उत्पत्ती लॅटिन भाषेतील Fariae या सण किंवा मेजवाणी असा अर्थ असणाऱ्या शब्दापासून झाली आहे. ‘यात्रा शब्दाचा अर्थ मिरवणूक किंवा उत्सव असाही आहे.’

पर्यटनाचा मुख्य घटक असलेल्या यात्रा स्थळांचा विकास झाला तर देशाच्या संस्कृतीची जोपासना होईल व त्याचबरोबर देशाची अर्थव्यवस्था मजबूत होईल. आर्थिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय दृष्टीने यात्रा हा घटक महत्त्वाचा ठरतो. काही यात्रा या परंपरागत चालत आल्या आहेत. तर काही नवनिर्मित आहेत. आज आधुनिक युगात जसजसा व्यापारीकरणाचा प्रसार होऊ लागता तसतसे त्यासाठी आवश्यक असणाऱ्या वाहतुकीच्या साधनातही वाढ होऊ लागली. त्याचबरोबर यात्रेमध्ये सहभागी होणाऱ्या यात्रेकरुंची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे.

## १.२ अभ्यास क्षेत्र :

लातूर जिल्हा हा महाराष्ट्राच्या दक्षिण-पूर्व सीमेवर आणि कर्नाटकाच्या उत्तर पूर्व सीमेजवळ वसलेला दिसून येतो. लातूर जिल्हा हा महाराष्ट्राच्या औरंगाबाद विभागातील एक महत्त्वाचा जिल्हा आहे. महाराष्ट्र राज्याच्या नकाशात लातूर जिल्हा हा अग्नेय दिशेस आहे. लातूर जिल्ह्याच्या उत्तरेस परभणी जिल्हा आहे. ईशान्येस नांदेड, आग्नेयेस व दक्षिणेस कर्नाटक राज्य आहे. जिल्ह्याच्या दक्षिणेस नैऋत्य व पश्चिमेस उस्मानाबाद जिल्हा आहे. जिल्ह्यात एकूण २ उपविभाग (लातूर व उदगीर) असून १० तालुके आहेत. तर या जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार १७°५२' उत्तर अक्षवृत्त ते १८°५०' उत्तर अक्षवृत्त यांच्या दरम्यान असून रेखावृत्तीय ७६°१२' पूर्व रेखावृत्त ते ७९°१८' पूर्व रेखावृत्ताच्या दरम्यान आहे. लातूर जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ७१५७ चौ.कि.मी. (२७६३ चौ.मैल) इतके आहे. लातूर जिल्ह्याची समुद्रसपाटीपासूनची सरासरी उंची ६३१ मीटर आहे. २०११ च्या जनगणनेनुसार लातूर जिल्ह्याची लोकसंख्या २४,५५,५४३ इतकी आहे.

## १.३ अभ्यास क्षेत्राची निवड :

यात्रास्थळे व वाहतूक जाळयांचे भौगोलिक विश्लेषण करण्यासाठी लातूर जिल्ह्याची निवड करण्यात आलेली आहे. लातूर जिल्ह्याची निवड करताना लातूर जिल्ह्यातील यात्रास्थळाबरोबरच पर्यटन विकासाला वाव मिळणे तसेच पर्यटन विकासाबरोबर वाहतुकीच्या जाळयांचा व यात्रास्थळांशी संबंधीत लहान मोठ्या उद्योगाला चालना देण्यासाठी हा अभ्यास फायदेशीर ठरेल. या माध्यमातून केलेले संशोधन महाराष्ट्र सरकारच्या पर्यटनाच्या विविध योजना राबवण्यास उपयोगी ठरू शकतो. तसेच यात्रा ठिकाणासंबंधी व वाहतूक मार्गाच्या जाळ्यांची माहिती मिळविण्यासाठी फायदेशीर ठरू शकते.

या अभ्यास विषयाच्या संशोधनाचा मुख्य उद्देश म्हणजे या जिल्ह्यातील विविध सामाजिक, आर्थिक, भौगोलिक, राजकीय परिस्थितीचा यात्रा ठिकाणावर व ग्रामीण संस्कृतीवर काय प्रभाव आहे याचा अभ्यास करणे. लातूर शहर हे या जिल्ह्याचे मुख्यालय आहे. या शहरास प्राचीन इतिहास आहे. हे शहर राष्ट्रकुट घराण्याची राजधानी होती. त्यानंतर हे शहर अनेक राज्यकर्त्यांच्या अधिपत्याखाली होते. १९ व्या

शतकामध्ये ते हैद्राबाद संस्थानच्या अधिक्षेत्रात होते. १९४८ मध्ये मराठवाडा हा हैद्राबादच्या निझाम राजवटीतून महाराष्ट्रात समाविष्ट झाला. कालांतराने उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन होऊन १५ ऑगस्ट १९८२ या रोजी नवीन लातूर जिल्हा अस्तित्त्वात आला.

### १.४ अभ्यासाची ध्येये व उद्दिष्ट्ये

१) अभ्यास क्षेत्रातील प्राकृतिक, सामाजिक व आर्थिक घटकांचा अभ्यास करणे.

२) यात्रास्थळांचे अभिक्षेत्रीय वितरण व त्यांचा प्राकृतिक व सामाजिक घटकांशी असलेल्या संबंधाचा अभ्यास करणे.

३) यात्रास्थळांची वाढ व विकास यांचा अभ्यास करणे.

४) यात्रास्थळांची केंद्रीयता व श्रेणीस्तर रचना यांचा अभ्यास करणे.

५) यात्रास्थळांच्या प्रभावक्षेत्राचा अभ्यास करणे.

६) यात्रास्थळे व वाहतूक जाळे यांच्या सहसंबंधाचा अभ्यास करणे.

७) अभ्यास क्षेत्रात काही नवीन यात्रास्थळे निश्चित करणे.

### १.५ माहिती संकलन :

या संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम स्वरूपाच्या आकडेवारीचा आधार घेतला जाणार आहे. प्राथमिक स्वरूपाची माहिती लातूर जिल्ह्यातील विविध यात्रास्थळांना भेटी देवून प्रश्नावलीच्या माध्यमातून प्राप्त केली जाणार आहे. दुय्यम स्वरूपाची माहिती व आकडेवारी विविध वर्षाचे सामाजिक व आर्थिक समालोचन, जनगणना अहवाल, जिल्हा गॅझेटिअर, विविध संदर्भ ग्रंथ, संशोधन लेख व इंटरनेटवरील माहितीचा आधार घेतला जाणार आहे.

### १.६ संशोधन पद्धती :

प्रस्तुत शोधप्रबंधासाठी मिळविण्यात येणारी प्राथमिक व द्वितीयक माहितीचे विश्लेषण विविध तक्ते व आलेखाच्या साह्याने केले जाणार आहे. हे विश्लेषण करण्यासाठी सांख्यिकी पद्धती वापरण्यात येणार आहे. कार्ल पिअरसन यांची सहसंबंध पद्धत प्रस्तुत संशोधनात वापरण्यात येणार आहे. यात्रास्थळ व क्षेत्र, वस्त्या आणि लोकसंख्या यांचा सहसंबंध काढला जाणार आहे. तसेच वाहतूक जाळ्याचा व यात्रा

स्थळे यांचाही संबंध अभ्यासण्यात येणार आहे. त्याकरिता खालील सूत्र वापरण्यात येणार आहे.

$$r = \frac{\Sigma dxdy}{\sqrt{(\Sigma dx)^2 \times (\Sigma dy)^2}}$$

अभ्यास क्षेत्रातील यात्रास्थळांचे अभिक्षेत्रीय वितरण कशा पद्धतीने झालेले आहे हे पाहण्यासाठी निअरेस्ट नेबर पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. यासाठी खालील सूत्र वापरले जाईल.

$$RN = \frac{\text{Observed Mean Distance}}{\text{Expected Mean Distance}}$$

$$0.5\sqrt{\frac{A}{N}}$$

खुलासा :

RN = Randomties

A = Total Area

N = Total Number of Fair Centers

यात्रास्थळांचे क्षेत्रफळ, वसाहत संख्या व लोकसंख्येनुसार असलेले वितरण अभ्यासण्यासाठी $S.D. = \sqrt{\frac{\Sigma(x-\bar{x})^2}{N}}$ या सुत्राचा वापर करण्यात येईल.

यात्रास्थळांचे प्रभावक्षेत्र अभ्यासण्यासाठी विविध चार पद्धतींचा वापर प्रस्तुत संशोधनात केला जाणार आहे. त्यात जॅक्सन यांची सुधारीत पद्धत, व्ही.एल.एस. प्रकाश राव यांची सुधारीत पद्धत, सक्सेना यांची सुधारीत पद्धत आणि अनुभवाधिष्ठित पद्धत यांचा वापर करण्यात येणार आहे.

## I) Jackson's Modified Method

1) $(\text{Influence area according to area} = \frac{\text{Total Area}}{\text{Total No. of Fair Centre}}$

2) $(\text{Influence area according to villages} = \frac{\text{Total Villages}}{\text{Total No. of Fair Centre}}$

3) $(\text{Influence area according to population} = \frac{\text{Population}}{\text{Total No. of Fair Centre}}$

II) V.L.S.Prakash Rao Method

$$D = \frac{T \times A}{U} \;/\; R = \frac{T \times A}{U}$$

Modified Method

$$SI = \frac{TC \times A}{U} \;/\; R = \frac{\sqrt{TC \times A}}{U}$$

III) सक्सेना यांचे प्रभावक्षेत्राचे सूत्र

$$\text{त्रिज्या} = \frac{(\text{एकूण क्षेत्र}) \times (\text{यात्रास्थळांची एकूण लोकसंख्या})}{\text{संपूर्ण अभ्यास क्षेत्राची एकूण लोकसंख्या}}$$

सुधारीत सुत्र $$\text{त्रिज्या} = \sqrt{\frac{(\text{एकूण क्षेत्र}) \times (\text{यात्रास्थळांची एकूण लोकसंख्या})}{\text{संपूर्ण अभ्यास क्षेत्राची एकूण लोकसंख्या}}}$$

**१.७ प्रकरण मांडणी / नियोजन :**

"लातूर जिल्ह्यातील यात्रास्थळ व वाहतूक जाळयांचा भौगोलिक अभ्यास" हा अभ्यास विषय असून खालीलप्रमाणे प्रकरण मांडणी करण्यात येणार आहे.

**प्रकरण ०१ : संकल्पनात्मक आराखडा**

१.१ प्रस्तावना

१.२ अभ्यास क्षेत्र

१.३ अभ्यासाची उद्दिष्ट्ये

१.४ गृहितके

१.५ माहिती संकलन

१.६ अभ्यास पद्धती

१.७ अभ्यास क्षेत्राची निवड

१.८ साहित्याचे पुनरावलोकन

१.९ प्रकरण मांडणी

**प्रकरण ०२ : अभ्यास क्षेत्राची भौगोलिक व सामाजिक स्थिती**

२.१ प्रस्तावना

२.२ ऐतिहासिक पार्श्र्वभूमी

२.३ स्थान व विस्तार

२.४ भूपृष्ठरचना

२.५ नदीप्रणाली

२.६ मृदा

२.७ हवामान

२.८ वनस्पती

२.९ लोकसंख्या

२.१० वसाहत

२.११ कृषी

२.१२ जलसिंचन

२.१३ उद्योगधंदे

२.१४ रस्ते व वाहतूक दळणवळण

**प्रकरण ०३ : यात्रास्थळांचे अभिक्षेत्रीय वितरण**

३.१ प्रस्तावना

३.२ यात्रास्थळांचे तहसीलनिहाय वितरण

३.३ यात्रास्थळांचे अभिक्षेत्रीय वितरण

३.४ यात्रास्थळांचे नेअरेस्ट नेबर विश्लेषण

३.५ यात्रास्थळांचे प्रारूप निहाय वितरण

३.६ यात्रास्थळांचे कालावधीनुसार वितरण

३.७ यात्रास्थळांचे धर्मनिहाय वितरण

३.८ यात्रास्थळांचे चक्र प्रारूप

**प्रकरण ०४ : यात्रास्थळांची वाढ व वैशिष्ट्ये**

४.१ प्रस्तावना

४.२ यात्रास्थळांच्या प्रादेशिक वाढीची वैशिष्ट्ये

४.३ तहसिलनिहाय यात्रास्थळांची लोकसंख्या वाढ

४.४ यात्रास्थळांच्या लोकसंख्या वाढीचा दर

४.५ तहसिलनिहाय यात्रास्थळांत झालेली वाढ

४.६ यात्रास्थळनिहाय लोकसंख्येत झालेली वाढ

**प्रकरण ०५ : यात्रास्थळांची केंद्रीयता आणि श्रेणी**

५.१ प्रस्तावना

५.२ केंद्रीयता संकल्पना

५.३ केंद्रीयतेचे मोजमाप

५.४ केंद्रीयततेचे प्रादेशिक विश्लेषण

५.५ यात्रास्थळांच्या केंद्रीयततेचे तहसिलनिहाय विश्लेषण

५.६ श्रेणी स्तर संकल्पना

५.७ यात्रास्थळ श्रेणीचे प्रादेशिक विश्लेषण

५.८ यात्रास्थळांच्या श्रेणीचे तहसिलनिहाय विश्लेषण

**प्रकरण ०६ : यात्रास्थळांचे प्रभाव क्षेत्र**

६.१ प्रस्तावना

६.२ प्रभाव क्षेत्र अभ्यास पद्धती

६.३ प्रभाव क्षेत्र अभ्यासण्यासाठी निवडण्यात आलेल्या पद्धती सैद्धांतिक पद्धत

६.३.१ जॅक्सनची सैद्धांतिक पद्धत

६.३.२ व्ही.एल.एस. रावची सैद्धांतिक पद्धत

६.३.३ सक्सेनाची सैद्धांतिक पद्धत

६.३.४ अनुभवाधिष्ठित पद्धत

**प्रकरण ०७ : यात्रास्थळ व वाहतूक जाळे**

७.१ प्रस्तावना

७.२ यात्रास्थळांची घनता

७.३ रस्ते घनता

७.४ लोहमार्ग घनता

७.५ यात्रास्थळ व वाहतूकीचे विविध मार्ग यांचा सहसंबंध

७.६ तहसिलनिहाय रस्ते घनता व यात्रास्थळ घनता यांचे वितरण

७.७ तहसिलनिहाय लोहमार्ग घनता व यात्रास्थळ घनता

**प्रकरण ०८ : यात्रास्थळाचे इतर घटक**

८.१ प्रस्तावना

८.२ यात्रास्थळाचा विकास स्तर

८.३ यात्रास्थळांचे प्रादेशिक विश्लेषण

८.४ यात्रास्थळाचा नियोजन आराखडा

८.५ यात्रास्थळाच्या वाहतूक आणि दळणवळण विकासाचा आढावा

८.६ यात्रास्थळांचे निश्चितीकरण (Proposed Fair Centres)

**प्रकरण ०९ : निष्कर्ष, शिफारशी व उपाययोजना**

९.१ प्रस्तावना

९.२ निष्कर्ष

९.३ शिफारशी व उपाययोजना

**संदर्भ :**


१) ईश्वर म्हसलेकर (२०१५), अ जिओग्राफिकल स्टडी ऑफ फेर सेंटर इन जालना डिस्ट्रीक्ट, अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

२) नेगी, जगमोहन (१९९९), पर्यटन एवं यात्रा के सिद्धांत, तक्षशिला प्रकाशन, अन्सारी रोड, दरियागंज, नई दिल्ली-०२

३) A.K. Sarkar (2003) Indian Tourism Management Motivation & Mobility, Rajat Publication, New Delhi.
४) Bhatia, A.K. (1978) 'Tourism in India History and Development', Sterling Publishers Pvt. Ltd., New Delhi.
५) भारतीय जनगणना अहवाल
६) लातूर जिल्हा गॅझेटिअर
७) लातूर जिल्हा सामाजिक, आर्थिक समालोचन
८) www.googleearth.world, India, Maharashtra, Latur
९) www.latur.nic.in.

संशोधक
**संगमेश्वर ज्ञानोबा भांगे**

मार्गदर्शक
**प्राचार्य डॉ.सदानंद हरिबा गोने**
उज्वल ग्रामीण महाविद्यालय,
घोणसी ता.जळकोट जि.लातूर